सामाहिक
वडगावशेरी समाचार
संपादक : नानासाहेब रामचंद्र शिरसाट उपसंपादक : संदिप शिरसाट | Date : 03/07/2023
शहरातील बातम्या : मुंबई, लोणावळा, पुणे, नाशिक, नागपूर, बारामती, अहिल्यानगर, संभाजीनगर
RNI NO : MAHMAR/2023/91091 | फोन नंबर : 9765350717 | Email : wadgaonsherisamachar@gmail.com

वेल्हे परिसरात गोळीबारात ज्येष्ठ नागरिकाचा मृत्यू; आरोपीला पोलिसांनी घेतले ताब्यात

वडगावशेरी समाचार प्रतिनिधी : सागर शिरसाट

वेल्हे, पुणे : वेल्हे पोलीस ठाण्याच्या हद्दीत जुन्या भांडणाच्या कारणावरून झालेल्या गोळीबारात गंभीर जखमी झालेल्या ज्येष्ठ नागरिकाचा उपचारादरम्यान मृत्यू झाल्याची घटना समोर आली आहे. या प्रकरणी पोलिसांनी आरोपी ओंकार यादव गावडे याला ताब्यात घेतले असून पुढील तपास सुरू आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, १३ ऑक्टोबर २०२६ रोजी सायंकाळी साडेसहा वाजण्याच्या सुमारास वेल्हे-नसरापूर रस्त्यावरील कानंदवाडी परिसरात हा प्रकार घडला. विजय मारुती बसवे (वय ७५, रा. माळवली, ता. राजगड, जि. पुणे) यांच्यावर जुन्या भांडणाच्या कारणावरून गोळीबार करून जीवे मारण्याचा प्रयत्न केल्याचे पोलिसांच्या प्रेस नोटमध्ये नमूद आहे. या घटनेत गंभीर जखमी झालेल्या बसवे यांना प्रथम वेल्हे येथील ग्रामीण रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले..



वेल्हे येथे गोळीबार! ७५ वर्षीय ज्येष्ठ नागरिकाचा मृत्यू;

जुन्या भांडणातून ज्येष्ठ नागरिकावर गोळीबार; वेल्हे पोलिसांकडून आरोपीला ताब्यात

त्यानंतर पुढील उपचारासाठी पुण्यातील ससून रुग्णालयात हलविण्यात आले. मात्र, उपचारादरम्यान त्यांचा मृत्यू झाला. या प्रकरणी वेल्हे पोलीस ठाण्यात गुन्हा रजिस्टर क्रमांक ८१/२०२६ अन्वये भारतीय न्याय संहिता कलम १०९(१), शस्त्र अधिनियम कलम ३(२५) आणि महाराष्ट्र पोलीस अधिनियम कलम १३५ नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी तपासाची चक्रे वेगाने फिरवत आरोपी ओंकार यादव गावडे याला १४ ऑक्टोबर २०२६ रोजी ताब्यात घेतले. वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली पुढील तपास सुरू आहे.